नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०१/२०२६ (मंगळवार)**

---

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री साठी साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, एमआयडीसी बोरी पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी**:— दिनांक २६/०१/२०२६ रोजी एमआयडीसी बोरी पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, महिला आरोपी हिने तिच्या किराणा दुकाना मध्ये महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुंगधीत तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा गांगापुर झोपडपट्टी येथे जावुन पंचासमक्ष महिला आरोपीच्या दुकानाची झडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष एकुण ९ सिलबंद पॅकेट मधील प्रतिबंधीत सुंगधीत तंबाखु किंमती १६८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे एमआयडीसी बोरी येथे भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्य पोलीस स्टेशन नरखेड येथे पार पडले सांस्कृतिक कार्यक्रम

**पोलीस स्टेशन नरखेड** :— ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्य दिनांक २६/०१/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे नरखेड युथ ऑर्गनायझेशन व पोलीस स्टेशन नरखेड यांच्या संयुक्त विद्यमाने चित्रकला स्पर्धाचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यक्रमामध्ये चित्रकला स्पर्धेमध्ये वर्ग नर्सरी ते आठवी पर्यंत तसेच विज्ञान प्रदर्शनी व सांस्कृतिक स्पर्धाचे

आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यक्रम पोलीस स्टेशन येथील पटांगणावर पार पाडला. सदर स्पर्धेमध्ये स्पर्धकांना स्मृतीचिन्ह तसेच प्रोत्साहनपर वस्तू बक्षिस म्हणून देण्यात आल्या. सदर स्पर्धेमध्ये ५०० ते ६०० नरखेड परिसरातील शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनी व शिक्षक वृंद तसेच इतर सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.






# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १६ गुन्हे नोंद

दिनांक २६/०१/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण १९,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत ०२** गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल **अंतर्गत ०३ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन बेला** येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी **अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे**. पोलीस स्टेशन बोरी **अंतर्गत ०२ गुन्हे नोंद आहे**. पोलीस स्टेशन कन्हान **अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे**. पोलीस स्टेशन सावनेर **अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे**. पोलीस स्टेशन कळमेश्वर **अंतर्गत ०४ गुन्हे नोंद आहे**. पोलीस स्टेशन उमरेड **अंतर्गत ०१ गुन्हा नोंद आहे**. असे एकुण **महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये १६ गुन्हे दाखल केले आहे.**

**सदर कारवाईत २७००० मिली देशी दारू, ८१ लीटर मोहाफुल दारू असा एकुण १९,३००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

# नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७३४ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक २७/०१/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. एकुण ७३४ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३५ आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३८ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २६ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२६ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ३९ आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३२ आरोपी अशा एकुण १३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३२ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ५३ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३४ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे २४ आरोपी अशा एकुण १४० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ६१ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५४ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे २९ आरोपी अशा एकुण १७४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७३४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने